पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-४११ ०१८, लेखा विभाग
क्र. लेखा/१०/काबि/ 32 /२०२०
दि. 13 /१०/२०२०

प्रति,

मा. कार्यकारी अभियंता
अ,ब,क,ड,ई,फ,ग,ह क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

विषय :- बयाणा / अनामत परतावाकामी सादर केलेली नस्ती पुर्तता झालेनंतर लेखा विभागातून तात्काळ घेऊन जाणेबाबत.

महोदय,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत बयाणा / अनामत रक्कम परतावाकामी निविदेच्या मुळ नस्ती (टेकनीकल नस्ती) या कार्यालयाकडे सादर केल्या जातात. तद्नंतर बयाणा / अनामत रक्कम परतावाची कार्यवाही पुर्ण झालेनंतर क्षेत्रिय कार्यालयाने लेखा विभागातून निविदेच्या मुळ नस्ती तात्काळ घेऊन जाणे आवश्यक आहे. परंतू सदर नस्ती लेखा विभागात पडून आहेत. याबाबत लेखाविभागामार्फत वारंवार पाठपुरावा (भ्रमण दुरध्वनीव्दारे संपर्क साधून) करणेत येत आहे.

तथापि कार्यवाही पूर्ण होऊनही सदर नस्ती लेखा विभागातून अद्यापही नेलेली नाही. सदर नस्ती गहाळ होण्याची शक्यता आहे. तरी संबंधितांनी सदर नस्त्या लेखा विभागातून तात्काळ घेऊन जाणे.
हि विनंती.

आपला विश्वासू,

उप मुख्यलेखापाल
लेखा विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८